# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६

## (सकाळी १०-३० ते ११-४५ वाजता)

(क) **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(गुरूवार, १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)** —

**श्री. योगेश टिळेकर,** ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रविण दरेकर, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"पुणे शहरातील गुंठेवारी कायद्यांतर्गत घरे नियमित करण्यासाठी सन २००१ पर्यंतची असलेली मुदत वाढविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंतची घरे या कायद्यान्वये नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला असणे, ही घरे नियमित करण्यासाठीचे शुल्क राज्य सरकारकडून निश्चित करून देण्यात येणे, तसेच त्याला 'युनिफाईड डीसी रूल' आणि 'रेडी-रेनकरची' जोड दिल्याने घरे नियमित करण्यासाठी भरमसाट शुल्क नागरिकांना भरावे लागत असणे, आजपर्यंत १०१२ अर्ज महानगरपालिकेकडे दाखल असून फक्त ३५ प्रकरणात गुंठेवारी मंजूर होणे, प्रकरण दाखल करताना मोजणी करणे आणि विमान प्राधिकरणाचा दाखला या अटी जाचक असणे, त्याचप्रमाणे गुंठेवारी करताना एका गुंठा नियमित करण्यासाठी साधारण रुपये १५ लाख खर्च येणे, त्यामुळे गुंठेवारी करण्यासाठी नागरिकांना अडचणीचे होत असणे, यासाठी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी व नागरिकांना गुंठेवारी सुलभपणे करण्यासाठी मोजणी करणे आणि विमान प्राधिकरणाचा दाखला या जाचक अटी शिथिल करून गुंठेवारीसाठी येणाऱ्या भरमसाठ खर्चामध्ये कपात केली तर नागरिकांचा गुंठेवारी करण्याकडे कल वाढणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६, सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६, मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६, बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून

त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : (क) प्रश्नोत्तरे**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली ते बारावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे**

**दोन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(१) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३३ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

मौजे कोंडीविटा, तालुका अंधेरी येथील झोपड्या विकास आराखडयानुसार रस्ता रुंदीकरणाकरिता निष्कासित करण्यात आल्याबाबत.

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३१ वर जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास 'केंद्रीय प्रकल्प' दर्जा देण्याबाबत.

(३) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३२ वर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री निवेदन करतील :-**

लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्र, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे कार्यरत असलेल्या लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड या रसायन उत्पादक कंपनीच्या कारखान्यामुळे होत असलेल्या प्रदूषणाबाबत.

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री. संजय केणेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"कोव्हिड—१९ नंतरच्या काळात ठाणे शहरातून मुंबई व इतर ठिकाणी प्रवासासाठी पिवळ्या नंबर प्लेटची (व्यावसायिक) वाहने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली असणे, सदर वाहनांमध्ये सिटीफ्लो, ओला, उबेर व अन्य खासगी कंपन्यांच्या वाहनांचा समावेश असणे, या वाहनांच्या वाढीमुळे ठाणे शहरात पार्किंगचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे, ही वाहने सर्व्हिस रोड, घोडबंदर रोड तसेच गृहनिर्माण सोसायट्यांच्या मोकळ्या जागेत व प्रवेशद्वारांसमोर उभी राहत असल्याने तेथील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागणे, या वाहनांसाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र (डेडिकेटेड) पार्किंग बेस/झोन निर्माण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री सुनिल शिंदे,** राजहंस सिंह, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई आज ही तहानलेली असणे, पिण्याच्या पाण्यासाठी येथील नागरिकांना संघर्ष करावा लागणे, मुंबईला प्रत्यक्षात प्रतिदिन ४,४०० ते ४,५०० एमएलडी पाण्याची गरज असताना, सद्य:स्थितीत केवळ प्रतिदिन फक्त ३,८०० ते ३,९७५ एमएलडी पाण्याचा होत असलेला पुरवठा, याचाच अर्थ मुंबईला दररोज ५०० ते ७०० एमएलडी पाण्याची भासत असलेली कमतरता, हे आकडे महानगरपालिका व सरकारचे अधिकृत आकडे असणे, मुंबईची लोकसंख्या आज १.४ ते १.५ कोटींहून अधिक असून सन २०४१

पर्यंत लोकसंख्या १.७ कोटींपेक्षा जास्त होण्याची शक्यता असणे, त्यावेळी मुंबईला ६,५०० एमएलडी पेक्षा जास्त पाण्याची गरज लागणार असणे, त्यामुळे आजच जर मुंबई तहानलेली असेल, तर उद्याची मुंबई कशी जगणार हा सर्वसामान्य जनतेला गहन प्रश्न पडलेला असणे, मुंबईचा संपूर्ण पाणीपुरवठा भातसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, मोडक सागर, तानसा, विहार व तुळशी या ७ जलाशयांवर अवलंबून असून हे सर्व स्त्रोत मान्सूनवर अवलंबून असणे, जुन्या व जीर्ण पाईपलाईनमधून मोठ्या प्रमाणावर होत असलेली पाणी गळती, त्यामुळे मुंबईतील काही भागांत जाणवणारी तीव्र पाणी टंचाई, परिणामी नागरिकांना खाजगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याने त्यातून होत असलेले अनपेक्षित शोषण, पाण्याच्या समान व न्याय्य वितरणाचा असलेला अभाव, परिणामी मुंबईकर नागरिकांत पसरलेली नाराजीची भावना, यास्तव मुंबईला भेडसावणाऱ्या अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या समस्येवर शासनाने तातडीने हाती घ्यावयाच्या ठोस उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री.किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कलम २३ (१) नुसार शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केलेली असणे, सेवेतील सर्व शिक्षकांना ही परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी दोन प्रयत्नांची मुदत दिलेली असणे, नवीन नोकरीला लागणारे उमेदवार व सेवेतील शिक्षक या सर्वांसाठी एकच परीक्षा घेतली जाणे, सेवेतील शिक्षकांसाठी हे दोन प्रयत्न उत्तीर्ण होण्यासाठी अपुरे असणे, सेवेतील शिक्षकांसाठी या परीक्षेची कठीण पातळी कमी करून वेगळी परीक्षा आयोजित करण्याची गरज असणे, सेवेतील शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याकरिता ६० व ५५ टक्के ऐवजी ४५ टक्के गुणांची अट देण्याची गरज असणे, सेवेतील शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी प्रयत्न वाढवून देण्याची सुद्धा गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४)** **श्री.संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अमरावती येथे कापूस पणन महासंघाच्या अंतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ मर्यादित 'मोमीकॉल' (MOMICOL)- या फॅक्टरीची सुमारे २५ एकर मोकळी जागा असून सदर जागा यापूर्वीही विक्रीसाठी काढण्यात आलेली असणे, परंतु तांत्रिक बाबींचा विचार करून त्यावेळी सदर प्रक्रिया थांबविण्यात येणे, मात्र आता पुन्हा एकदा ही २५ एकर शासकीय जागा विक्रीसाठी काढण्यात आली असून त्यासाठी नव्याने निविदा (Tender) प्रसिद्ध करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२६ दरम्यान निदर्शनास येणे, सदर जागा ही मोक्याच्या ठिकाणी असून

भविष्यात जिल्हा स्तरावरील विविध शासकीय-प्रशासकीय इमारती, न्यायालयीन संकुल किंवा सार्वजनिक सुविधांसाठी या जागेचा अत्यंत प्रभावी वापर होऊ शकतो, ही बाब शासन विचारात घेत नसल्याचे दिसून येत असणे, शासकीय मालकीची जागा खाजगी व्यक्तींना देण्यापेक्षा ती भविष्यातील गरजेसाठी आरक्षित ठेवावी, अशी आग्रही मागणी अमरावतीमधील स्थानिक जनतेकडून सातत्याने होत असूनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, तरी जनहिताचा विचार करून सध्याची नवीन निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करून सदर २५ एकर जागा शासकीय कारणास्तव आरक्षित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **डॉ. परिणय फुके,** ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाज्योती संस्थेमार्फत ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबवली जाणारी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना प्रशासकीय दिरंगाईमुळे पूर्णतः रखडलेली असणे, आयबीपीएस, बँकिंग, रेल्वे आणि कर्मचारी निवड आयोग यांसारख्या परीक्षांच्या प्रशिक्षणासाठी दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ पर्यंत निविदा मागवल्या होत्या, मात्र सहा महिने उलटूनही अद्याप संस्थांची निवड न होणे किंवा प्रत्यक्ष वर्गांना सुरुवात झालेली नसणे, या प्रशिक्षणासाठी राज्यभरातून २० ते २२ संस्थांनी निविदा सादर केल्या असून इच्छुक विद्यार्थ्यांचे अर्जही मागविण्यात आले होते, तरीही प्रशासकीय स्तरावर व्यवस्थापकीय संचालकांच्या बदलीनंतर उद्‌भवलेल्या तांत्रिक अडचणींमुळे ही प्रक्रिया जाणीवपूर्वक पुढे सरकत नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक वातावरणात राहून ऑफलाईन प्रशिक्षणाची मागणी केलेली असताना, महाज्योतीने ऑनलाईन प्रशिक्षणाची प्रक्रियाही कागदावरच ठेवल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, सरकारी भरती परीक्षांचे वेळापत्रक जवळ येत असताना केवळ अधिकाऱ्यांच्या निर्णय शून्यतेमुळे, निधीची तरतूद असूनही प्रशिक्षणाची अंमलबजावणी न झाल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर टांगती तलवार निर्माण झालेली असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून पुढील एका महिन्यात प्रशिक्षण संस्थांची निवड प्रक्रिया पूर्ण करणे, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे, रखडलेले प्रशिक्षण युद्धपातळीवर सुरू करून विद्यार्थ्यांना तातडीने दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंदू धर्मातील सर्वांत मोठा समाज/जमात/जात बंजारा असून देशातील हिंदू धर्मातील सर्वात वंचित मागास अविकसित घटक जमात/जातही बंजारा समाज असणे महाराष्ट्रातील बंजारा समाज हा पारंपारिकरित्या भटक्या-विमुक्त प्रवर्गातील एक मोठा घटक असून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असणे, स्वातंत्र्यानंतर अनेक योजना जाहीर झाल्या असल्या तरी त्या प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचलेल्या नसणे, महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ बंजारा समाजातील अनेक कुटुंबांना मिळत नसणे, वसाहतींना मूलभूत सुविधा घरकुल, शुद्ध पाणी, वीज, रस्ते व शैक्षणिक सोयींचा गंभीर अभाव असणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वसतिगृह व उच्च शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य वेळेवर मिळत नसणे, तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत होणारा विलंब, आरक्षणातील अपुरी टक्केवारी, रोजगार निर्मितीचा अभाव आणि पारंपारिक व्यवसायांना संरक्षण नसणे, बंजारा समाजाला आदिवासी संवर्गास लागू असलेल्या सर्व योजना आणि लाभ धनगर समाजाला लागू करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या सर्व योजना त्वरीत लागू करणे, बंजारा तरुणांसाठी नवी मुंबई, नांदेड, यवतमाळ, जालना, जळगाव, सोलापुर, लातूर या सात ठिकाणी पोलीस / मिलीट्री परिक्षण केंद्र, हस्तकला केंद्र विविध प्रशिक्षण केंद्र उभारणे, बंजारा समाजासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्याबाबत शासन दिरंगाई करीत असणे, याबाबतची शासनस्तरावरुन चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**पाच : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा–**

**सर्वश्री विक्रांत पाटील,** प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"MRTP-अधिनियमातील कलम १८ मधील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील (गावठाणाबाहेरील) विकास परवानगी देण्याचे अधिकार सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी व त्याबाबत पूर्व परवानगी ही सहायक संचालक, नगररचना अधिकारी, जिल्हा कार्यालय यांना असल्याने विकास परवानगी मिळणेकरिता ग्रामीण भागातील नागरिकांना भौगोलिकदृष्ट्या जवळ नसलेल्या जिल्हा मुख्यालयात जावे लागत असणे, जिल्हा स्तरावरील वाढता कामाचा व्याप, वेळेत परवानगी न मिळणे व त्यामुळे अनधिकृत बांधकामे वाढत तर आहेतच सोबत विकास परवानगी अभावी नागरिकांना संस्थात्मक वित्तपुरवठा मिळत नसणे, तसेच पायाभूत-सुविधांची जबाबदारी असलेल्या ग्रामीण स्वराज्य संस्थांना विचारात न घेताच जिल्हास्तरीय परवानगी देण्यात येणे (नागरी

स्थानिक संस्थेप्रमाणे ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेस घटनात्मक दर्जा प्राप्त), सध्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका किंवा नगर पंचायत कार्यालय असून शहरी भागातील विकास परवानग्या देण्याचे कामकाज मुख्याधिकारी व पूर्व परवानगी देण्याचे कामकाज टाऊन प्लॅनर/सहाय्यक टाऊन प्लॅनर यांचे मार्फत BPMS प्रणालीद्वारे दिले जाणे, त्यामुळे शहरी भागातील नागरिकांना सर्व परवानग्या वेळेत व हाकेच्या अंतरावर मिळत असताना ग्रामीण भागातील जनतेला अन्यायाला सामोरे जावे लागणे, सध्या संपूर्ण महाराष्ट्राचा प्रादेशिक नियोजन आराखडा तयार झाला असून संपूर्ण महाराष्ट्रभर एकत्रीकृत विकास प्रोत्साहन नियमावली लागू झाली असल्याने ग्रामीण भागातील नियोजन विषयक कामकाज व विकास परवानग्या या तालुकास्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व पूर्व परवानगी कामकाज हे तालुक्यातील नगरपंचायतीत उपलब्ध असलेल्या टाऊन प्लॅनर/ सहाय्यक टाऊन प्लॅनर यांच्याकडून देण्यात याव्यात ही ग्रामीण भागातून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**सात : (मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६, बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ व गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, चंद्रकांत रघुवंशी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री इद्रिस नायकवडी, अमरिशभाई पटेल, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, विक्रांत पाटील, दादाराव केचे, संदीप जोशी, योगेश टिळेकर, संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"दावोस मध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावरहाऊस' झाले असणे, १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, "माझी वसुंधरा अभियान" राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती

करण्याकरिता आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

(२) **श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरु असलेले युध्द, या युध्दजन्य परिस्थितीमुळे राज्यात अत्यावश्यक वस्तू तसेच सर्वसामान्य जनतेशी निगडीत असलेले पेट्रोल, डिझेल, वाणिज्य गॅस यांचा निर्माण झालेला तुटवडा, यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असणे, या वस्तूंचा होत असलेला काळाबाजार तसेच शेतीशी संबंधित केळी, कांदा व द्राक्ष इत्यादी निर्यात मालाचे कंटनेर बंदरात पडून असणे, या नाशवंत मालामुळे शेतकऱ्यांच्या बाजारात येणाऱ्या मालाला कवडी मोलाचा भाव मिळणे, परिणामी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याने शेतकरी उध्वस्त होणाच्या मार्गावर असणे, युध्दजन्य परिस्थितीमुळे परदेशात अडकलेले राज्याचे नोकरदार व पर्यटक यांच्यासंदर्भात करावयाची उपाययोजना, राज्यात कामगार संहिता लागू केली असून या चार संहिता स्वीकारल्यामुळे कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असणे, या कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी सभागृहाचे विरोधी पक्षातील सदस्य व कामगार नेते यांच्यासह काही सदस्यांची समिती नियुक्त करुन या विषयावर सर्वंकष विचारविनिमय करणे, आरोग्य विभागात औषध खरेदी, औषध पुरवठ्यातील घोटाळे आणि डॉक्टरांची अनुपस्थिती यासारख्या गंभीर अनियमितता आढळल्याने राज्यात आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया तसेच करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक ३ — महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल

यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२६ – श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक ४ – महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२६ – श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०२६ चे वि.प.वि.क्रमांक ५ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२६ – श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(ख)** **विचारार्थ** -

**(१)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ – डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ११ – महाराष्ट्रातील भावी पिढीच्या शाश्वत भवितव्याची तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ – श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १२ – महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक, २०२५ - ॲड. अनिल परब, वि.प.स. यांचे

**विधान भवन :**<br>
मुंबई,<br>
दिनांक : १२ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,<br>
सचिव-३,<br>
महाराष्ट्र विधानपरिषद.